**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २१ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **९८ व्या अखिल भारतीय साहित्य मराठी संमेलनाचं नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत उद्घाटन**
2. **राज्य शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेला सुरुवात,नागपूर विभागात १ लाख ५१ हजार ३७९ विद्यार्थी**
3. **जेनेरिक औषध केंद्रांच्या धर्तीवर आयुष औषध केंद्र सुरू करणार- केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची माहिती**
4. **महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी घेतली नागपूर महानगरपालिकेत बैठक**

**मराठी साहित्य संमेलन**

दिल्लीच्या तालकटोरा स्टेडियम येथे 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नुकतेच झाले असून याप्रसंगी संमेलनाच्या अध्यक्ष लोकसाहित्याच्या अभ्यासक तारा भवाळकर ,स्वागत अध्यक्ष शरद पवार ,महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रामुख्याने उपस्थित आहेत 1954 मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत संमेलन झाले होते त्यानंतर 2025 ला हे संमेलन दिल्लीला होत आहे. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यानंतरही दिल्लीत हे संमेलन होत आहे हे या संमेलनाचे वैशिष्ट्य आहे असे प्रास्ताविकातून उषा तांबे म्हणाल्या. यावेळी स्वागताध्यक्ष शरद पवार यांनी आपल्या भाषणातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत करीत त्यांचे आभार मानले. तारा भवाळकर यांनी महाराष्ट्राच्या उदार संस्कृतीचे प्रतीक आराध्य विठ्ठल रुक्मिणी असल्याचे यावेळी सांगितले -

***आपल्या देशाच्या पंतप्रधानांना ज्या विठ्ठलाची मूर्ती दिली ती विठ्ठल रखुमाईची मूर्ती हे आमचे आराध्य दैवते महाराष्ट्राचा आणि हे आमच्या उदाह संस्कृतीचं प्रतीक आहे.कानाडाहू विठ्ठल कर्नाटकु कर्नाटकातून आला महाराष्ट्रामध्ये स्थिर झाला आणि आजही वारीसाठी जी मंडळी येतात. ती नुसती मराठी मंडळी नसता. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणापासून ही सगळी मंडळी विठ्ठलाकडे येत असतात हा विठ्ठल कसा आहे मराठी माणसासारखा साधा आहे तांबळ खांदी वाहन पायी डोळी समनदास शामलरणगे सानरुपे ते साधेपण भासे***

भाषा हि एक जिवंत गोष्ट असून संतांनी ती टिकवली असे देखील त्या म्हणाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या उपस्थितांना संबोधित करत आहे यावेळी त्यांनी काही मराठी बोलून उपस्थितांची मन जिंकली, या संमेलनानिमित्त विविध प्रकारचे कार्यक्रम ज्यामध्ये काव्य कट्टा ग्रंथ प्रदर्शन ग्रंथदिंडी यांसारखे अनेक उपक्रम समाविष्ट आहेत . संमेलनानिमित्त आज सकाळी ग्रंथदिंडीचं आयोजन करण्यात आलं होतं.

दहावीची परीक्षा

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावीच्या लेखी परीक्षेला आजपासून सुरुवात झाली. यंदा राज्यातल्या ५ हजार १३० मुख्य केंद्रावर परीक्षा होत असून १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी निर्धारित वेळेनंतर १० मिनिटे वेळ वाढवून देण्यात येणार असल्याचं मंडळानं कळवलं आहे.नागपूर विभागातून ६८२ केंद्रांवर १ लाख ५१ हजार ३७९ विद्यार्थी आहेत, तर नागपूर जिल्ह्यातील २२० केंद्रावर ५७ हजार ४९५ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा ३ ते २० फेब्रुवारीदरम्यान घेण्यात आली होती. लेखी परीक्षा आता २१ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान घेण्यात येणार आहे.

आरोग्यावर होणारा खर्च

देशात मागच्या दहा वर्षात आरोग्यावर होणारा खर्च चौसष्ट टक्क्यांवरून घटून सुमारे एकोणचाळीस टक्के इतका झाल्याची माहिती केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी दिली आहे. नवी दिल्लीत आंतरराष्ट्रीय आरोग्य संवाद २०२५ या कार्यक्रमात ते आज बोलत होते. पंतप्रधान जन आरोग्य योजनेसह राष्ट्रीय आरोग्य योजना आणि अन्य अशा योजनांमधून पुरवल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांमुळे खर्चात ही घट झाल्याचं ही ते म्हणाले.

इलेक्ट्रिक वाहनाचे वाटप

दिव्यांग व्यक्तींना इलेक्ट्रिक वाहने चालविण्यासाठी आवश्यक सहाय्य प्रदान करणे तसेच त्यांची गतिशीलता आणि स्वावलंबन वाढविणे या उद्देशाने समेकीत क्षेत्रीय कौशल विकास, पुनर्वसन आणि दिव्यांगजन सशक्तीकरण केंद्र नागपूर Neo Motion आणि Youth for Jobs यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्तींसाठी विशेष इलेक्ट्रिक वाहनाचे वाटप आणि झोमॅटो कंपनीच्या नियुक्ती पत्राचं वाटप नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्या हस्ते करण्यात आले. यामुळे दिव्यांग व्यक्तींचे जीवन सुकर होणार आहे, अशी भावना सीआरसीचे संचालक यांनी व्यक्त केली -

***यूथ फॉर जॉब यांच्या संयुक्त विद्यमाने न्यू मोशन आयआयटी, चेन्नई बेस्ट यांच्या तत्वज्ञानानुसार आणि आमच्या करारानुसार एक आज इथे पंधरा आम्ही मोटराईस मोपेड वितरित करत आहे ज्याद्वारे दिव्यांगांना त्यांच्या पायावर उभं***

***राहता यावं आणि ते आपल्या एक जीवनामध्ये सक्षम पद्धतीने त्यांना जीवन जगता येईल.***

नागपुरातील यशवंत स्टेडियम येथील समेकीत क्षेत्रीय कौशल विकास, पुनर्वसन आणि दिव्यांगजन सशक्तीकरण केंद्र नागपूर येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात करण्यात आले होते. 15 व्यक्तींना वाहन आणि नियुक्ती पत्रे यावेळी प्रदान करण्यात आली.

प्रतापराव जाधव

जेनेरिक औषध केंद्रांच्या धर्तीवर आयुष औषध केंद्र सुरू करणार असल्याची माहिती केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली आहे. तसंच भविष्यात आयुष मंत्रालयाच्या कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात येणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल धन्वंतरी पुरस्कार वितरण सोहळा आणि 'देश का प्रकृति परीक्षण' मोहिमेच्या पहिल्या टप्प्याच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. देश का प्रकृति परीक्षण अभियानाचा पहिला टप्पा २५ डिसेंबर रोजी यशस्वीरित्या पूर्ण झाला. या अभियानात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या राज्यांचा तसंच आयुर्वेदिक महाविद्यालयांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

डॉ. अनंत पांढरे

संभाजीनगर येथील डॉ. हेडगेवार रुग्णालयाचे विश्वस्त डॉ अनंत पांढरे यांची नागपूर मधील नामांकित अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थानच्या (एम्स) अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. अनंत पांढरे रेड क्रॉस संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष असून गेल्या ३५ वर्षांपासून डॉ. हेडगेवार रुग्णालयाचे संचालक म्हणून कार्यरत आहेत.

धमकी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं वाहन बॉंबनं उडवून देण्याची धमकी दिल्याच्या प्रकरणात मुंबई पोलिसांनी आज दोन व्यक्तींना अटक केली. बुलढाणा जिल्ह्यातल्या देऊळगावराजा इथून या दोघांना आज सकाळी ताब्यात घेण्यात आलं. अभय शिंगणे आणि महेश वायाळ अशी या दोघांची नावं असून, त्यांची मुंबईत गोरेगाव पोलिस ठाण्यात चौकशी सुरू आहे. काल एका ईमेलद्वारे ही धमकी मिळाल्यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत चोवीस तासात संशयितांना ताब्यात घेतलं आहे.

एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केलं आहे की मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना किंवा एसटी बसमध्ये अर्धे भाडे अशा कुठल्याही योजना बंद होणार नाहीत. आज नागपूरमध्ये कन्हान येथे एका जाहीर सभेला संबोधित करण्याअगोदर ते बातमीदारांशी बोलत होते. दरम्यान एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज गोंदिया जिल्ह्यातील देवरी येथे पक्षाचा मेळावा संपन्न झाला. यावेळी मंत्री संजय राठोड,

आमदार नरेंद्र भोंडेकर यांची उपस्थिती होती. यावेळी सहसराम कोरोटी यांनी शिवसेनेत प्रवेश केला. गोंदिया जिल्ह्याच्या विकासासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज त्यांनी बोलून दाखवली

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी काल नागपुरात पर्यावरण आणि प्रदूषणाबाबत महानगर पालिकेमध्ये बैठक घेतली. यावेळी त्यांनी मनपाला अनेक सूचना केल्या. एकदाच वापरता येणाऱ्या प्लास्टिकचा वापर करणारे, कोळसा तसेच लाकडाचा वापर करणाऱ्या रेस्टॉरंटवर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले. दरम्यान पर्यावरण हानी करणाऱ्या बाबी आढळल्यास मनपाने किती दंड आकारावा, याचा अभ्यास करण्याची गरज त्यांनी बोलून दाखवली -

***केबायलॉज मे आप स्टडी करो whether you can reduce that fine or you can make some alterations in that fine तो वो स्टडी करेंगे क्योंकि समझो अगर मैंने किसी को पाच सौ रूपया फाइन लगा दिया, एक बार लगाया, दो बार लगाया और तीसरी बार वो गलती नहीं करेगा सो दॅट इस व्हाई हम कॉर्पोरेशन ने हमने उनको रेकमेंड किया है कि आप आपके लेवल पे स्टडी कीजिए। इन फैक्ट हम स्टेट लेवल पर भी वो स्टडी कर रहे हैं तो उस स्पाइन में मोडिफिकेशन करने की जरूरत है क्या?***

हवामान

नागपूरसह विदर्भात उन्हाळ्याची चाहूल लागली असून कमाल तापमानात सातत्यानं वाढ जाणवत आहे. नागपुरात आज छत्तीस पूर्णांक सहा दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली. विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान अकोला येथे 36. 7 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं .सर्वाधिक किमान तापमान अमरावती येथे पंधरा पूर्णांक सात इतकं नोंदवण्यात आलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

स्कूल ऑफ अल्टीमेट लीडरशिप संमेलनातून केवळ देशातच नाही तर आंतरराष्ट्रीय पातळीवर नाव कमावणारं नेतृत्व तयार होईल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. त्यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं सोल लीडरशीप संमेलनाचं उद्घाटन करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. भूतानचे पंतप्रधान दाशो शेरिंग तोबगे यावेळी उपस्थित होते. राष्ट्र उभारणीसाठी नागरिकांचा विकास खूप महत्त्वाचा असून, स्कूल ऑफ अल्टिमेट लीडरशिपची स्थापना विकसित भारताच्या प्रवासाच्या दिशेने एक महत्त्वाचं पाऊल आहे, असं पंतप्रधान म्हणाले.

******